दैनिक अन्यायाचा प्रतिकार महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १६ वे ● अंक ३५७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.२४ मार्च २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### नैना प्रकल्पाचा शेतकऱ्यांवर व भूमीपुत्रावर कुठलाही अन्याय होणार नाही

# शेतकऱ्यांना भरावा लागणाऱ्या सुधारणा शुल्काला (बेटरमेंट चार्ज) स्थगिती : ना. एकनाथ शिंदे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईला पर्याय म्हणून नवी मुंबईची स्थापना करण्यात आली. नैना प्रकल्पाची स्थापना दि. १० जानेवारी २०१३ रोजी करण्यात आली. या प्रकल्पाच्या माध्यमातून अशा प्रकारचा विकास नैनाच्या माध्यमातून अपेक्षित होता. ज्याप्रकारे कामाला गती मिळायला पाहिजे होती ती काही अडचणींमुळे मिळाली नाही ही वस्तुस्थिती आहे. यामुळे तेथील शेतकऱ्यांवर व भूमीपुत्रावर कुठलाही अन्याय होणार नाही. शेतकऱ्यांवर कुठलाही भार न पडता यासाठी त्यांना भरावा लागणाऱ्या सुधारणा शुल्काला ( बेटरमेंट चार्ज ) स्थगिती देण्यात येत आहे. याबाबतचे धोरण निश्चित करुन निर्णय घेऊ, असे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत सांगितले.

नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा सदस्य जयंत पाटील यांनी उपस्थितीत केली होती. यावर उत्तर देताना श्री. शिंदे बोलत होते. या चर्चेत बाळाराम पाटील, प्रसाद लाड, अनिकेत तटकरे यांनी सहभाग घेतला होता.



नगरविकास मंत्री श्री. शिंदे म्हणाले, शेतकऱ्यांकडून घेण्यात येणाऱ्या सुधारणा शुल्काला तुर्तास स्थगिती दिली असून शेतकऱ्यांवर कुठलाही दबाव न आणता त्यांना विश्वासात घेऊन सर्व विकासकामे पूर्ण झाल्यानंतर त्यांच्याकडून जमीन खरेदी विक्रीच्या वेळेस सुधारणा शुल्क ( बेटरमेंट चार्ज ) घेण्यात येईल. सिडकोच्या माध्यमातून टाउन प्लॉनिंग तयार करण्यात आले आहे. सभागृहाच्या सदस्यांच्या भावना लक्षात घेता. २०13 रोजी अंतरिम विकास योजना तयार करण्यात आली असून २४ एप्रिल २०17 च्या अधिसूचनेनुसार ३७ चौरस किलोमीटर क्षेत्रावर मंजूर झाला. १६ सप्टेंबर २०१९ रोजी ३३४ चौ.किलोमीटर क्षेत्रापैकी २६७६ क्षेत्रावर १५२ गावाचा समावेश करण्यात आला आहे.यासाठी सिडकोच्या माध्यमातून ११ टाऊन प्लान तयार करण्यात आले आहे. तसेच ४६१ चौरसमीटर क्षेत्रावर या परिसराचा विकास करण्याचे धोरण आहे.

टाऊन प्लॅन एक आणि दोन योजनेला शासनाने मंजुरी दिली आहे. विकास योजना पूर्ण झाली आहे. विकास योजना दोनच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत. तसेच विकास योजना तीन शासन मंजूरीसाठी आहे. टिपी स्किम चार, पाच, सहा, सात, आठ याबाबत लवकर सूचना व हरकती मागविण्यात आल्या आहेत.

रस्ते, दिवाबत्ती, गटार, पाणीपुरवठा योजना, वाहतूक व्यवस्था, मैदान, शाळा, हॉस्पीटल ही सर्व विकास कामे करायची आहेत. या सर्व पायाभूत सुविधा देण्यासाठी सिडको खर्च उचलणार आहे. जमिनीचा मोबदला न देता साडे बावीस टक्के जास्त जमीन देण्याचा निर्णय घेतला आहे. ४० टक्के जमिन भूमीपूत्र शेतकऱ्यांना आणि ६० टक्के सिडकोला असे धोरण सिडकोने तयार केले आहे. ६०/४० वाटप असल्याने शेतकऱ्यांचा दाखला संपुष्टात येतो. शेतकऱ्यांना दाखला मिळाला पाहिजे यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल. वने आणि गावठाणाच्या जमिनीबाबत शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांना न्याय दिला जाईल. जमीन मालक विषय टाकुन दाखला दिला जाईल. कुठल्याही शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकल्याशिवाय कुठलीही कार्यवाही किंवा वसूली केली जाणार नाही.

सिडको जमीन संपादनासाठी पैसे देत नाही तर सर्व पायाभूत सुविधा देण्यासाठी सिडको खर्च उचलणार आहे. ६० टक्के सिडकोकडे येणार आहेत ६०/ ४० ची योजना आली नसती तर जमीन मालकांना ४० टक्के जमिनीवर २.५ एफएसआय देत आहोत. ग्रीन झोनमध्ये ०.१ तर रेसिडेन्सल झोनमध्ये १.० टक्के एफएसआय देण्यात येत आहे. ओपन स्पेस, पार्किंग रोड, यासाठी शेतकऱ्यांना ४० ते ४५ टक्के जमीन द्यावी लागली असती. महसूल विभाग, नगर रचना विभाग, भूमीअभिलेख विभाग, जिल्हाधिकाऱ्यांच्याकडे विविध विषय असल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. याबाबत सर्व अधिकार सिडकोकडे देऊन एक खिडकी योजना तयार करण्यात येणार आहे. जेणेकरुन सर्व कामे एकाच ठिकाणी होतील. यामध्ये महसूल विभागाचा मोठा वाटा आहे. नवीमुंबई विमानतळामुळे जो भाग प्रभावित झाला आहे. त्यामध्ये सुधारणा करायची आहे.

## राज्यातील सेतू सुविधा केंद्र पुन्हा सुरू होणार ; राज्यमंत्र्यांचं विधानसभेत उत्तर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील तहसील कार्यालयातील 'सेतू सुविधा केंद्र' हे टेंडरची मुदत संपल्याने बंद झाले आहेत. त्यामुळे नागरिकांना इतर ठिकाणी हेलपाटे मारावे लागत आहेत. त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याची दखल घेऊन आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी राज्यातील 'सेतू सुविधा केंद्र' तातडीने पूर्ववत करा, अशी मागणी अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंगळवारी (ता. २२) लावून धरली. त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाचे राज्यमंत्री दत्त–त्रेय भरणे यांनी 'सेतू सुविधा केंद्र' पूर्ववत करण्याबाबत लवकरात लवकर टेंडर प्रक्रिया सुरू केली जाईल, असे आश्वासन दिले.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार धिरज देशमुख यांनी लातूरसह राज्याच्या वेगवेगळ्या भागात बंद असलेल्या सेतू सुविधा केंद्राकडे लक्ष वेधले. या केंद्राच्या माध्यमातून एका छताखाली मिळणाऱ्या सर्व सुविधा बंद झाल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना प्रमाणपत्रांसाठी आता इतर ठिकाणी चकरा माराव्या लागत आहेत. अधिकचे पैसे मोजावे लागत आहेत. अशा विविध अडचणीला जनतेला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे 'सेतू सुविधा केंद्र' तातडीने सुरू करा, अशी मागणी आमदार धिरज देशमुख यांनी केली.

तहसील कार्यालय हे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी एक महत्वाचे केंद्र आहे. तिथे आल्यानंतर सेतू सुविधा केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना विविध प्रमाणपत्रांबाबत ज्या सुविधा मिळत होत्या, त्या सेवा टेंडरची मुदत संपल्याने ३१ डिसेंबरपासून बंद आहेत. त्यामुळे होणारी गैरसोय राज्य सरकारने विचारात घ्यायला हवी आणि नव्याने टेंडर काढायला हवे, असे आमदार श्री. धिरज देशमुख यांनी सांगितले. त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नासंदर्भात उत्तर देताना सामान्य प्रशासन विभागाचे राज्यमंत्री मा. दत्तात्रेय भरणे यांनी 'सेतू सुविधा केंद्र' पूर्ववत करण्याबाबत लवकरात लवकर टेंडर प्रक्रिया सुरू केली जाईल, असे आश्वासन दिले.

## सांगा आम्ही खेळायचे कुठे? पालीतील एकमेव बालोद्यान मोजतेय अखेरची घटका



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

काही महिन्यांपूर्वी लहानग्यांनी गजबजलेल्या पालीतील एकमेव बालोद्यानाची प्रचंड दुरवस्था झाली आहे. सद्यस्थितीत हे बालोद्यान अखेरची घटका मोजत असल्याने अनेक नागरिकांनी याबाबत संताप व्यक्त केला आहे.

संघर्ष ग्रुप आणि तत्कालीन पाली ग्रामपंचायती मार्फत लहान मुलांची गरज ओळखून येथील राम आळी मध्ये हे बालोद्यान बनविण्यात आले होते. त्यानंतर पाली ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपंचायतमध्ये होण्याची प्रक्रिया सुरू झाली आणि नगरपंचायतीवर प्रसासकांची नेमणूक झाली. दरम्यानच्या काळात उद्यानाकडे दुर्लक्ष झाले.

मात्र नुकतीच नगरपंचायत निवडणूक होऊन नगरपंचायत प्रस्थापित झाली. यावेळी या बलोद्यानाला नवी झळाळी येईल अशी अपेक्षा होती मात्र हे बालोद्यान जैसे थेच आहे. येथील पाळणे, सी–सॉ, गेट व बाकडे तूटले आहेत. तारेचे कुंपण अनेक ठिकाणी मोडले आहे. त्यामुळे येथे गुरांचे सर्रास वास्तव असते. येथील झाडे व गवत कोमेजून गेले आहे. फरशांची दुरवस्था झाली आहे. आजूबाजूला वाहने पार्क केलेली असतात. परिणामी लहानग्यांना खेळण्यासाठी हक्काचे ठिकाण नसल्याने त्यांचा प्रचंड हिरमोड होत आहे.

## संक्षिप्त...

### आंबेत पूल दोन महिन्यांकरिता राहणार बंद

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार म्हाप्रळ आंबेत पुरार रस्त्यावरील सावित्री खाडीवरील कि.मी.०/८०० मधील आंबेत पूल दुरुस्तीच्या कामाकरिता सर्व प्रकारच्या वाहतुकीस पुढील दोन महिन्यांकरिता बंद करणे आवश्यक असल्याची जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांची खात्री पटल्याने त्यांनी दि.०४ मार्च २०२२ पासून दोन महिन्यांकरिता हा पूल सर्व प्रकारच्या वाहतुकीस बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

यापूर्वी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांनी म्हाप्रळ आंबेत पुरार रस्त्यावरील सावित्री खाडीवरील कि.मी. ०/८०० मधील आंबेत पूल हा सर्व प्रकारच्या वाहतुकीस बंद करण्याबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांनी (१) मंडणगड व दापोली येथून मुंबई पुणेकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी म्हाप्रळ महाड रस्ता व दापोली लाटवण करंजाडी महाड (२) मुंबई व पुणे येथून मंडणगड व दापोलीकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी महाड म्हाप्रळ मंडणगड व महाड करंजाडी लाटवण दापोली या पर्यायी मार्गाने मार्गस्थ करता येईल, असे अभिप्राय दिलेले आहेत व त्यानुसार हा पूल सर्व प्रकारच्या वाहतुकीस बंद करण्यात आलेला आहे.

म्हाप्रळ आंबेत पुरार रस्त्यावरील सावित्री खाडीवरील कि.मी. ०/८०० मधील आंबेत पूल हा एकूण ३७६ मीटर लांबीचा मोठा पूल आहे. हा पूल जवळजवळ ४३ वर्ष जुना असून, पुलाचा पाया कमकुवत झाल्याने अधीक्षक अभियंता, संकल्पचित्र मंडळ (पूल) यांनी सूचविल्याप्रमाणे पूलाच्या पायाच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कार्यवाही सुरु करण्यात आली आहे, असे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांनी कळविले आहे.

### जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली

## जिल्हा पुरवठा शाखेकडून पुरवठाविषयक बाबींसंदर्भात कार्यशाळेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील पुरवठाविषयक बाबींसंदर्भात रास्त भाव धान्य दुकानदार, पेट्रोल पंप व डिझेल पंपधारक, एल.पी.जी. गॅस वितरक, खाद्यतेल व खाद्यतेलबियांचे व्यापारी, शिवभोजन केंद्र चालक/ मालक, ऑईल कंपन्याचे जिल्हा संघटक व असिस्टंट मॅनेजर, तालुका पुरवठा शाखेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी कार्यशाळा शुक्रवार, दि.२५ मार्च २०२२ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० या वेळेत जिल्हा नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यशाळेमध्ये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे नाविन्यपूर्ण उपक्रम, योजना, सुधारीत ग्राहक संरक्षण कायदा २०१९ मधील सुधारणा, ग्राहकांचे हित जोपासण्याच्या अनुषंगाने आवश्यक बदल यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच भारत सरकारची डिजिटल इंडिया ही महत्वाकांक्षी योजना असून तिचा उद्देश नागरिकांना सर्व शासकीय सुविधा या इलेक्ट्रॉनिक पध्दतीने उपलब्ध करुन देणे हा आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.छगन भुजबळ तसेच पुरवठा विभागाचे प्रधान सचिव श्री.विजय वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील रास्त भाव धान्य दुकानदार यांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून नुकतेच CSC-e- Goverance Service India limited या कंपनीसोबत करारनाम्यावर स्वाक्षरी झालेली आहे. सीएससी सेंटर च्या माध्यमातून राज्यातील रास्त भाव दुकानदार आता दुकानांमधून पुढील

.../२

## डिझेल परताव्याचे ३९ कोटी वितरीत करण्यास वित्त विभागाची मान्यता : ना.अस्लम शेख

### राज्यातील मासेमारी यांत्रिकी नौकाधारकांना दिलासा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील यांत्रिकी मासेमारी नौकांना डिझेल परताव्याचे रु.३९ कोटी वितरीत करण्यास वित्त विभागाने सहमती दर्शवली असल्याची माहिती राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख यांनी बुधवारी दिली.

२०२१–२२ या आर्थिक वर्षामध्ये डिझेल तेलावरील मुल्यवर्धीत कर प्रतिपुर्ती या योजनेसाठी याआधी रु.६० कोटींची तरतुद आली होती. हा निधी पूर्णत: वितरीत करण्यात आलेला आहे. हिवाळी अधिवेशनात डिझेल परताव्यासाठी रु.५० कोटी निधी मंजूर करण्यात आला. पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेल्या रु.५० कोटी निधीपैकी ३९ कोटी निधी वितरीत करण्यास वित्त विभागाने सहमती दर्शविली आहे.

मंत्री अस्लम शेख म्हणाले की, आधीच्या सरकारच्या काळात डिझेल परताव्याचा अनुशेष १६३ कोटींच्या घरात गेला होता. हा अनुशेष भरुन काढत आतापर्यंत रु. २१०.६५ कोटींपर्यंत डिझेल परताव्यासाठी निधी मत्स्यव्यवसाय विभागाने वितरीत केला आहे. चालू आर्थिक वर्षात ६० कोटींपर्यंत निधी वितरीत करण्यात आला आहे.

२०१९–२० या आर्थिक वर्षात रु.९०.६५ कोटी, २०२०–२१ या आर्थिक वर्षात रु.६० कोटी तर २०२१–२२ या आर्थिक वर्षात रु.६० कोटी असा एकूण रु.२१०.६५ कोटी निधी डिझेल परताव्यापोटी वितरीत करण्यात आलेला आहे. चालू आर्थिक पुरवणीमागणीद्वारे मंजूर करण्यात आलेल्या एकूण ५० कोटी निधीपैकी रु. ३९ कोटींचा निधी वितरीत करण्यास वित्त विभागाकडून सहमती मिळाल्याने चालू आर्थिक वर्षात हा आकडा एकूण रु २४९.६५ कोटींपर्यंत जाणार आहे. महाराष्ट्रात सध्या १६० मच्छीमार सहकारी संस्थांच्या ९६४६ यांत्रिकी नौकांना डिझेल कोटा मंजूर करण्यात आलेला आहे.

अशा प्रकारे जिल्हानिहाय वितरीत करण्यात येणार डिझेल परतावा : पालघर (रु.२.४४ कोटी), ठाणे (रु.२.३४ कोटी)मुंबई –उपनगर (रु.१०.२४ कोटी), मुंबई शहर ( ०८ कोटी), रायगड(०७ कोटी), रत्नागिरी (०८ कोटी) व सिंधुदुर्ग (९८ लाख)

## भुवनेश्वर येथे १०० खाटांचे स्त्री रुग्णालय उभारण्यासाठी शासकीय जमीन हस्तांतरित करण्याचे आदेश पारित

### आदिती तटकरे यांचे जिल्ह्याच्या विकासकामाबाबत आणखी एक यश

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा बळकटीकरणाचा ध्यास घेतला आहे. या पार्श्वभूमीवर मौजे भुवनेश्वर, ता.रोहा, जि. रायगड येथे १०० खाटांचे स्त्री रुग्णालय विशेष बाब म्हणून स्थापन करण्यास शासनाने नुकतीच मान्यता दिली आहे. लवकरच येथे १०० खाटांचे अद्ययावत स्त्री विशेष रुग्णालय उभे राहणार आहे.



हे स्त्री रुग्णालय उभारण्यासाठी शासकीय जमीन मिळण्याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक यांनी शासनाला विनंती केली होती. या विनंतीच्या अनुषंगाने पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी या बाबीचा नियमितपणे पाठपुरावा केला. याबाबत पालकमंत्र्यांनी दिलेल्या निर्देशानुसार रोहा उपविभागीय अधिकारी यांनी तात्काळ पडताळणी करुन रोहा तालुक्यातील मौजे भुवनेश्वर येथे १०० खाटांचे स्त्री रुग्णालय बांधकामासाठी शासकीय जागा प्रस्तावित केली. मौजे भुवनेश्वर, ता.रोहा येथे १०० खाटांचे स्त्री रुग्णालय स्थापन करण्यासाठी येथील सर्व्हे नंबर हिस्सा नंबर ६८/०९/१ क्षेत्र २.४७.३१ हेक्टर आर पैकी १.६८ ३१ हेक्टर आर इतकी शासकीय मिळकत जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडे हस्तांतरित करण्याचे आदेश दिले आहेत. पालकमंत्र्यांनी जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा बळकट करण्याचा नुसता ध्यासच घेतला नाही तर टप्प्याटप्प्याने त्या जिल्ह्यातील विकासकामांची एकामागे एक यशस्वीपणे पूर्तताही करीत असल्याचे दिसून येत आहे.

## पोलीसांची अशीही माणुसकी; अपंग व्यक्तीच्या सायकलला भर रस्त्यात दिला आधार

### वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार गावडेंनी घडवले माणुसकीचे दर्शन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पोलीस म्हटले की आपल्या डोळ्यासमोर उभे राहते ते म्हणजे केवळ एक कर्तव्यकठोर व्यक्तिमत्त्व. मात्र या पोलिसी वर्दीमध्ये एक मायाळू आणि कनवाळू देवदूत देखील दडला असल्याचा प्रत्यय पनवेलकरांना आला. मंगळवारी (दि.२२ मार्च) संध्याकाळी पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत नवीन पनवेल सिग्नल पॉईंट जवळ आपले कर्तव्य निभावत असलेले पोलीस हवालदार गावडे यांना एक अपंग व्यक्ती त्यांच्या तीन चाकी सायकलवरून उड्डाणपुलावरून जात असल्याचे दिसले. सदर व्यक्तीला नवीन पनवेल उड्डाणपुलावरील चढण पार करताना त्रास होत



होता. त्या अपंग व्यक्तीची दमछाक पाहून पोलीस हवालदार गावडे यांनी क्षणाचाही विलंब न लावता अपंग व्यक्तीच्या मदतीला धावून गेले. सदर अपंग व्यक्तीच्या तीन चाकी सायकलला चढण पार होईपर्यंत धक्का देऊन उड्डाणपूलाच्या एका बाजूने दुसऱ्या बाजुपर्यंत जाण्यास गावडे यांनी सहाय्य केले. त्यावेळी त्यांनी कशाचीही तमा बाळगली नाही. त्यामुळे पोलिसांच्या अशाही माणुसकीचा प्रत्यय पनवेलकरांना आला. पोहवा गावडे यांच्या या आदर्श कृतीमुळे नवी मुंबई पोलीस दलाबद्दल लोकांमधून अतिशय चांगल्या प्रतिक्रिया येत आहेत. वरिष्ठांनी देखील गावडे यांचे कौतुक केले आहे. तसेच त्या अपंग व्यक्तीने देखील पोहवा गावडे यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

## बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ५०० चौ.फूटपर्यंतच्या सर्व निवासी मालमत्तांना करातून सूट : प्राजक्त तनपुरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ४६.४५ चौ.मीटर (५०० चौ.फूट) किंवा त्यापेक्षा कमी चटई क्षेत्र असणाऱ्या निवासी मालमत्तांना दि. १ जानेवारी २०२२ पासून संपूर्ण मालमत्ता करातून सूट देण्यात आली आहे. यामध्ये (५०० चौ.फूट) अथवा त्याहून कमी चटई क्षेत्र असलेल्या निवासी इमारती अथवा निवासी गाळ्यांवर आकारण्यात येणाऱ्या मालमत्ता करात संपूर्ण करमाफी करण्यात आली आहे, अशी माहिती, नगरविकास राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी विधान परिषदेत दिली.

याबाबत विधानपरिषद सदस्य रमेशदादा पाटील यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला उत्तर देताना नगरविकास राज्यमंत्री श्री.तनपुरे बोलत होते. या कर सुधारणेद्वारे मिळणाऱ्या सवलतीचा लाभ हा मालमत्तेच्या क्षेत्रफळावर अवलंबून आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील गावठाण, कोळीवाडे व आदिवासी पाडे या ठिकाणी स्थित निवासी मालमत्तेचे क्षेत्रफळ हे ५०० चौ.फूट पेक्षा कमी असल्यास याचा लाभ होत आहे. यामध्ये जवळपास १६ लाख निवासी मालमत्ता करधारकांना लाभ होणार आहे.

# पदरात निखारे टाकू नका

देशावर कोणतेही संकट आले, तेव्हा भारतीय जवानांइतक्याच धैर्याने आणि चिकाटीने शेतकऱ्यांनी ते संकट निवारले आहे. लालबहादूर शास्त्री यांच्या 'जय जवान, जय किसान' या घोषणेला म्हणूनच अर्थ होता. शेतकऱ्यांनी हरित क्रांती यशस्वी केली नसती, तर भारतीय स्वातंत्र्य कोणत्याही क्षणी महासत्तांच्या दारात गहाण पडण्याचा धोका होता. अशा या आसेतुहिमाचल नवसर्जन करणाऱ्या शेतकऱ्याला एकाही सरकारने, सत्ताधाऱ्यांनी किंवा राज्य सरकारांनीही पुरता न्याय दिलेला नाही; त्यामुळेच भारतीय स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव होत असतानाच शेतकरी अस्वस्थ होत होता. तो पुढे संघटित झाला आणि जवळपास तीन दशके प्रखर लढे देत राहिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेने मंजूर केलेली तीन कृषी विधेयके मागे घेण्याची घोषणा गेल्या नोव्हेंबर महिन्यात केली. त्याआधी वर्षभर प्रामुख्याने पंजाब व उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांनी आंदोलन केले. या दोन्ही राज्यांमधील निवडणुका पार पडल्यानंतर तीन विधेयकांचा मुद्दा पुन्हा चर्चेत यावा; यातच शेतकऱ्यांचा राजकीय लाभासाठी राजकीय पक्ष कसा वापर करतात, यांचे इंगित दडले आहे. शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अनिल घनवट यांनी पत्रकार परिषद घेऊन सर्वोच्च न्यायालयाला सादर केलेल्या अहवालाचा तपशील दिला. मोदी सरकारने आणलेले कृषी कायदे शेतकऱ्यांच्या हिताचे होते आणि ते मागे घेतले जाऊ नयेत, असा अहवाल घनवट समितीने एकमताने सर्वोच्च न्यायालयाला सादर केला होता. मात्र, हा अहवाल दिल्यानंतर एक वर्ष उलटले, तरी सर्वोच्च न्यायालयाने विनंती करूनही हा तपशील सर्वांसमोर आणला नाही, अशी तक्रार घनवट यांनी केली आहे. खरे तर, ही समिती सर्वोच्च न्यायालयानेच नेमली होती; तेव्हा या समितीचा अहवाल आपण जनतेसमोर का ठेवला नाही, याचे उत्तर त्याने द्यावे. ही समिती नेमताना न्यायालयाने आपल्या अधिकारांत या कायद्यांना स्थगिती दिली होती; मात्र त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे तिन्ही कायदे मागे घेण्याची घोषणा अचानक केल्यामुळे आंदोलन, समितीचे काम आणि न्यायालयातील सुनावणी हे सगळे एकदमच संदर्भहीन झाले. तेव्हा मोदींनी देशाच्या दूरगामी हितासाठी हा निर्णय घेतल्याचे सूचक विधान केले. त्याचाही खुलासा त्यांनी अद्याप केलेला नाही. एकीकडे, पंजाब व उत्तर प्रदेशात नवी सरकारे सत्तारूढ होत असताना घनवट यांनी जाहीरपणे हा विषय पुन्हा काढावा, यामागे निश्चित काही आखणी असणार. ती येत्या काही दिवसांत उलगडत जाईल. शेतकऱ्यांचा राजकारणासाठी कसा वापर होतो, याची दोन उदाहरणे दरम्यानच्या काळात दिसली. उत्तर प्रदेशाचे निकाल लागल्यानंतर राजेश टिकैत यांनी उद्वेग व्यक्त केला. त्यात मतदारांवरचा रागही होता. आता घनवट यांच्या गौप्यस्फोटानंतर टिकैत 'तिन्ही कायदे परत आणण्याचा केंद्राचा डाव आहे,' असे म्हणत आहेत. हा एका अर्थाने आंदोलनाचा इशारा आहे. दुसरीकडे, 'शेतकरी आंदोलनाने मशागत करून दिली होती. पुढचे काम राजकीय पक्षांचे होते,' असे बेसावध विधान योगेंद्र यादव यांनी स्वभाव सोडून केले. शेतकऱ्यांचे आंदोलन हे राजकीय लक्ष्य गाठण्यासाठी होते, हा त्यांच्या विधानाचा अर्थ आहे; मात्र उत्तर प्रदेशात ते साधले नाही. पंजाबातील नव्या सत्ताधाऱ्यांना कोण मित्र मानते, हा प्रश्नच आहे. या पार्श्वभूमीवर, अनिल घनवट 'बहुसंख्य शेतकरी संघटना आणि शेतकरी नव्या कायद्यांच्या बाजूचे होते,' असे ठामपणे म्हणत आहेत. यासाठी ते सर्वोच्च न्यायालयाला सादर केलेली आकडेवारी देत आहेत. ती खरी असेल, तर राजधानी आणि उत्तर प्रदेशातले शेतकरी आंदोलन हा तरी सर्व भारतीय शेतकऱ्यांचा प्रातिनिधिक आवाज होता का, असा प्रश्न पडतो. मग संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार घालविण्यासाठी जसे माहितीचा अधिकार व लोकपाल यांचे निमित्त करून आंदोलन छेडण्यात आले; तीच पद्धत वापरून, शेतकऱ्यांचे केवळ नाव वापरून मोदी सरकारच्या विरोधात राजकीय रण पेटविण्यात आले का? मात्र, या महाभारताचा सारांश हाच आहे, की आता तरी केंद्र सरकारने कृषी कायद्यांबाबत कोणतेही पाऊल टाकताना सर्वांशी आणि विशेषकरून सर्व राज्यांशी सविस्तर चर्चा करावी. मुख्य म्हणजे हा विषय तातडीने अ-राजकीय होण्याची गरज आहे. त्यासाठी पंतप्रधानांनी पुढाकार घ्यावा. बेशिस्त ऋतुमान, दलालांची मस्ती, अतर्क्य बाजार, जीवघेणी सावकारी, पिढीगणिक वाटण्या आणि बँकांचे कर्जफेडीचे ओझे या साऱ्यांनी भारतातला छोटा शेतकरी आधीच पुरता गांजला आहे. त्याला दिलासा देण्यासाठी पावले उचलण्याची गरज आता कधी नव्हे एवढी आहे. शेतकऱ्यांना विश्वास द्यायला हवा, त्यांना विश्वासात घ्यायला हवे. त्यामुळेच आता तरी त्याला पुढे करून नव्याने राजकारण होऊ नये. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर या आधीही पुरेशी गंभीर राष्ट्रीय परिचर्चा झालेली नाही. निदान आता ती व्हावी. ती न करता हातघाई झाली, तर पुन्हा शेतकऱ्याच्याच पदरात निखारे पडतील.

# रेडीमेड फ्युएल बाउझर ट्रक'द्वारे इंधन वितरण घरपोच सेवा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रेडीमेड फ्युएल बाउझर ट्रक'द्वारे इंधन वितरण घरपोच (डोअरस्टेप) पद्धतीने करण्यासाठी महिंद्रा समुहाचा एक भाग असलेल्या 'महिंद्रा ट्रक व बस डिव्हिजन'ने (एमटीबी)'रेपोज एनर्जी' या कंपनीशी भागीदारी केली आहे. कंपन्यांच्या, संस्थांच्या दारी जाऊन इंधनाचे वितरण करण्याचा व्यवसाय देशभरात झपाट्याने विकसीत होत आहे. कोविडपश्चात काळात या व्यवसायाच्या प्रमाणात आणखी वेगाने वाढ होत आहे. जागतिक पुरवठा साखळी आणि इंधन व्यापाराचे अर्थशास्त्र, विद्यमान वितरण मॉडेलची संरचनात्मक मर्यादा, ग्राहकांची खर-`दीची बदलती मानसिकता आणि तांत्रिक नाविन्यता यांसह अनेक घटकांमुळे या व्यवसायात वाढ साध्य झाली आहे.

संदर्भात बोलताना,'रेपोज एनर्जी'चे सह-संस्थापक चेतन वाळुंज म्हणाले, फिरत्या सुविधांच्या सहाय्याने सर्व वस्तू उपलब्ध करून देण्याच्या दिशेने संपूर्ण जग वाटचाल करीत असताना, भारतातही डिझेलचे वितरण ग्राहकांना घरपोच इंधन पुरविण्याचा मार्ग सुलभ झाला आहे. मोबाईल पेट्रोल पंपांद्वारे डिझेलचे वितरण करणे ही आमची एक मोठी कामगिरी आहे. 'फ्युएल बाउझर'च्या उपयोजनेसाठी 'महिंद्रा फ्युरिओ'तर्फे आम्हाला उत्कृष्ट आणि अत्यंत उपयुक्त असे उत्पादन उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यामुळे आम्ही भारताच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात पोहोचू शकतो आणि भविष्यात सर्व प्रकारच्या ऊर्जा साधनांच्या वितरणात क्रांती आणू शकतो, असा आत्मविश्वास आम्हाला मिळाला आहे. आमच्या फ्युएल बाउझर युनिटमध्ये डबल डिस्पेंसिंग युनिट, पॉवर टेक-ऑफ युनिट, स्मार्ट फ्युएल लेव्हल सेन्सर्स, ब्रेक इंटरलॉक मेकॅनिझम, रिमोट थ्रॉटल, इंटेलिजेंट जिओ-फेन्सिंग आणि वापरण्यास सोपे असे रेपोज ॲप यांसारख्या वैशिष्ट्यांचा समावेश आहे.

'महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड'मधीलव्यापारी वाहन विभागाचे व्यवसाय प्रमुख जलज गुप्ता म्हणाले, खाणकाम, पायाभूत सुविधा, उत्पादन, रिअल इस्टेट, हॉस्पिटॅलिटी इत्यादी उद्योगांमध्ये डिझेलचा बराच खप होत असतो. तेथे डिझेल एकदम व मोठ्या प्रमाणात लागत असते. हे उद्योग बॅरल्स आणि बाउझर्स यांसारख्या चुकीच्या साधनांचा वापर करून पंपांवरून डिझेल खरेदी करतात. यामध्ये गळती, चोरी, डेड मायलेज अशा प्रकारांतून डिझेल वाया जाते, तसेच मनुष्यबळावर मोठा खर्चही होतो. त्यामुळे या उद्योगांचे मोठेनुकसानहोते.'फ्युएलबाऊझर'व्यवसायामधील 'रेपोजएनर्जी'च्या कौशल्याची जोडघेऊन, आम्हीया उद्योगांच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि राष्ट्र उभारणीत आमचे योगदान देण्यासाठी आकर्षक स्वरुपाचे उत्पादन सादर करीत आहोत. 'महिंद्रा'च्याव्यापारी वाहनांच्या श्रेणीतील हलक्या व मध्यम स्वरुपाच्या गाड्यांमध्ये काही विशेष गुणधर्म आहेत. या गाड्या 'फ्युएल बाउझर'च्या कामासाठी अगदी योग्य व फायदेशीर ठरणार आहेत.

'महिंद्राफ्युरिओ'या श्रेणीतील वाहनांमध्ये अधिक मायलेजची हमी मिळते, तसेच, आटोपशीर रचना, अधिक विश्वासार्हतेसाठी मजबूतव दणकट स्वरुपाची यंत्रणा, शहरांमध्ये सुलभतेने चालविण्यासाठी थोडक्या जागेत वळवता येण्याचे वैशिष्ट्य आणि आरामशीर, उत्तमप्रकारची केबिन अशा इतर वाहनांपेक्षा चांगल्या सुविधा 'महिंद्राफ्युरिओ'मध्ये आहेत. वाहन चांगल्या प्रकारे स्थिर राहण्यासाठी यात 'स्टँडर्डफ्रंटअँटी-रोलबार' देण्यात आलेला आहे. यातील 'आयमॅक्स इंटेलिजेंटटेलिमॅटिक्स'तंत्रज्ञानामुळे वाहनाचे कोठूनही ट्रॅकिंग करता येते. त्यामुळे या वाहनांतून मालवाहतूक करणे हे अधिक कार्यक्षम आणि फायदेशीर ठरते.



# मनोज पष्टे यांची मंचर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी नियुक्ती

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील रहिवासी मनोज पष्टे हे कर्जत नगरपरिषेद सह खोपोली, अलिबाग, बदलापुर, मुरबाड या ठिकाणी लेखा परीक्षक व लेखापाल म्हणून सतरा वर्ष सेवा बजावली ही सेवा बजावत असतांना त्यांना मुख्याधिकारी बनण्याची इच्छा होती त्या करता ते प्रयत्न करत होते.


अलिकडेच शासनाने दहा टक्के पदासाठी परीक्षा घेऊन पदोन्नती परिक्षा घेऊन नगपालिका, नगरपंचायत कर्मचारी तसेच अधिकारी पन्नोति देऊन मुख्याधिकारी काम करण्याची संधी देण्याचे ठरवले या संधीचे सोने करण्याचे मनोज पष्टे यांनी ठरवले सुरुवाती पासून जिद्दी तसेच मेहनती असलेल्या मनोज यांनी संचालक तथा आयुक्त नगपालिका प्रशासनाने मुंबई विभागीय घेतलेल्या परिक्षेत घवघवीत यश संपादन करुन महाराष्ट्र राज्यात तिसरा क्रमांकाने ही परीक्षा उत्तीर्ण झाले आणि सोमवार दि. २१ मार्च रोजी मनोज पष्टे यांनी मंचर नगपरिषेदच्या मुख्याधिकारी पदाची जबाबदारी स्वीकारली तसेच संध्या निवडणूक लांबणीवर पडल्याने तेथील जिल्हा अधिकारी यांनी प्रशासन म्हणून आणखी एक जबाबदारीवर पष्टे यांच्या खांद्यावर दिली आहे.



# आशिष गुप्ते यांच्या 'अतरंगी अ वर्ग ' पुस्तकाचे प्रकाशन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आशिष गुप्ते यांच्या व्हि के हायस्कूल, पनवेल ५ वी ते १० वी अ वर्ग ८५ ची बॅच वर्गात घडलेले विनोदी किस्से यावरती लिहिलेल्या 'अतरंगी अ वर्ग ' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ विनोदी लेखक व कवी अशोकजी नायगावकर यांच्या हस्ते झाले. या पुस्तकात विनोदी किस्स्यान बरोबर त्याला साजेशी अशी कार्टून्स आणि मुखपृष्ठ ही स्वतः आशिष गुप्ते यांनीच काढले आहे. प्रकाशन सोहळ्याला दहावी अ वर्गा तील विद्यार्थ्यांना आशीर्वाद देण्यासाठी साठे सर, बी पी म्हात्रे सर व सतपाळ सर आले होते. सदर प्रकाशन सोहळ्याला १० वी अ चे सर्व मित्र सहकुटुंब सहपरिवार उपस्थित होते. या कार्यक्रमाचे कौतुक करताना नायगावकर म्हणाले गेट टुगेदर तर खूप होतात. पण शाळेतील किस्स्यांवर पुस्तक लिहून मित्रान बरोबर त्याचे प्रकाशन करणे असा कार्यक्रम प्रथमच झाला आहे. त्यांनी पुस्तकातील व्यंगचित्रांचेही खूप कौतुक केले. पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यानंतर अशोक नायगावकर यांचा मिश्किली व कविता हा सदाबहार विनोदी कार्यक्रम झाला. मित्रांचा उत्स्फूर्त प्रतिसाद व सहभाग आणि नायगावकर यांचा खुमासदार शैलीतील कार्यक्रम यामुळे हा सोहळा अधिकच रंगतदार झाला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनघा गुप्ते यांनी केले.



# ॲक्टीव्हा गाडीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहराजवळील डी पॉईंट ब्रिज परिसरात उभी करून ठेवलेली आयुष जाजू याची ३० हजार रुपये किंमतीची होंडा कंपनीची ॲक्टीव्हा गाडी क्र.एमएच-४३-बीएम-७६३३ ही डी पॉईंट ब्रिज परिसरात उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# जासई येथे सेवानिवृत्त कामगारांचा भव्य सत्कार

**दै.रायगड नगरी । उरण**

जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट मधील जासई गावातील साधारणतः १६ कर्मचारी एकाचवेळी दि.२८ फेब्रुवारी २०२२ रोजी सेवा सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्त कामगारांचा सत्कार व शुभेच्छा चिंतन करण्याचे काम हे जवाहरलाल नेहरु पोर्ट मधील सर्व आजी - माजी बंधू भगिनी कर्मचारी आनंदाने खेळीमेळीने एकत्रित येवून निवृत्त कर्मचारी व बंधू -भगिनींचा सेवानिवृत्त कार्यक्रम नियमित राबवत असतात हा कार्यक्रम उत्कृष्ट पार पाडत असतात. यावेळीही हा कार्यक्रम उत्कृष्टपणे सर्वांच्या सहकार्याने पार पडला.जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट मध्ये काम करणारे जासई येथील कामगार बंधुभगिनी एकत्रीत जमून सेवानिवृत्तीचा कार्यक्रम सर्वानुमते करण्याचे संकल्पना मांडली. आणि त्यासाठी सर्व कामगार बंधुभगीनिनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रमासाठी कर्मचारी प्रत्येकी २०० रुपये एका सेवानिवृत्त कामगारांसाठी जमा करत आहेत. त्यातून या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.सेवानिवृत् कामगारास मान पान म्हणून शाल व श्रीफळ साडी व पॅन्ट शर्ट मोठी समई पूजेचे सर्व साहित्य मोठे तांब्याचे फिल्टर ,लाकडी आराम खुर्ची असे एकत्रीत सामन देऊन पती पत्नीस पुष्पगुच्छ व माळा घालून सुहासिनिकडून हळदी कुंकू लावून त्यांचा सत्कार करून सेवानिवृत्त कामगारांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील पंचरत्न हॉटेल चौक ते उरण रोड भारत गॅस गोडावूनच्या जवळ एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोली करीत आहेत.

सदर अनोळखी इसमाचे अंदाजे वय ४५ ते ५० वर्षे, उंची ५ फुट, रंग सावळा, बांधा मध्यम, चेहरा उभट, डोक्याचे केस वाढलेले पांढरे, दाढी मिशीचे केस पांढरे व साधारण वाढलेले आहेत. अंगामध्ये गुलाबी रंगाचा शर्ट व राखाडी रंगाची पॅन्ट परिधान केलेली आहे.


मे.मुजावर साो यांचे कोर्ट

**ॲड.प्रविण प्र. पिसाळ**
**अर्जदारांचे वकील**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.४२४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२७/०४/२०२२

१) श्री.मधुकर तुळजानसा कल्परुक्ष
वय : ७६ वर्षे, धंदा : काहीही नाही
२) श्री.मंजुनाथ मधुकर कल्परुक्ष
वय : ४३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.बी विंग-००१, ग्रीन हेवेन रेसिडेन्सी, माथेरान रोड,
कोप्रोली, नेरे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. सुभद्राबाई मधुकर कल्परुक्ष ह्यांचे निधन दि.०२/०३/२०१९ रोजी पॅनासिया हॉस्पिटल नवीन पनवेल येथे झाले असून श्री.मधुकर तुळजानसा कल्परुक्ष, वगैरे ह्यांनी कै.सुभद्राबाई मधुकर कल्परुक्ष यांच्या वारसदाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

श्री.मधुकर तुळजानसा कल्परुक्ष वगैरे हे कै.सुभद्राबाई मधुकर कल्परुक्ष यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.मधुकर तुळजानसा कल्परुक्ष वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.सुभद्राबाई मधुकर कल्परुक्ष यांच्या वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसदाखला मंजूर करेल.

आज दि.२३/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



## PUBLIC NOTICE

This to inform the general public, bank lenders and other financial institutions about the impending sale of the property located Survey number 30 hissa number 2 Village Dundre, Taluka Panvel District Raigad, primarily all the piece and parcel of land or ground admeasuring 980 Sq. Meters / 9.80 ghuntas lying and situated at Village Dundre, Taluka Panvel District Raigad.

**The aforementioned property is presently owned by**

1) Dilip Narayan Bhoir resident of Padghe, Pale Bk, Raigarh 410208
2) Meghnath Vitthal Patil resident of Vihighar, Nere, Raigarh 410206
3) Ravikant Shanivar Patil resident of Tembhode village, Nere, Raigarh 410218.

My client is desirous of purchasing the aforementioned property. Any person/bank lender/financial institution desires to oppose the impending sale in respect of the aforementioned property may do so within 30 days from the date of publication of this notice. You are requested to present your objections with adequate proof at the address mentioned herein below

**Advocate Paramvir Narula**
sector-12, bungalow no.- 15 and 17,
road no.-11, New Panvel east 410206, Mobile number- 9820623888, 8080767471,
Email id – paramvir1000@yahoo.com



## जाहीर सूचना

क्र.अपिल/डेस्क-१/आरटीएस/५७०/२०२१
विभागीय आयुक्त, कोकण विभाग कार्यालय
जुने सचिवालय, फोर्ट, मुंबई ४०००३२
दिनांक : १७/०३/२०२२

प्रती
१) श्री.अनिल भानजी गाळा
२) श्रीमती.दिपा अनिल गाळा
क्र.१ ते २ तर्फे अखत्यारी
श्री.राजेश विनायक भट
रा.३/१, सिताराम चाळ, गणेश मंदिराजवळ,
डॉ.हरयाळी गाव, विक्रोळी पूर्व, मुंबई — अपिलार्थी

विरुद्ध

१) श्री.युनूस समीउल्ला शेख
रा.रुम नं.८, कोहोजगाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे
२) श्रीमती.रंजना बळीराम पवार
३) श्रीमती.ताराबाई हरिश्चंद्र डुकरे
४) श्रीमती.सुवर्णा शिवराम घोडविंदे
५) श्री.एकनाथ वाळकू मसणे
२ ते ५ तर्फे कुलमुखत्यारी
श्री.असिफ रशीद मुल्ला
रा.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड — सामनेवाले

विषय : अपर जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील आदेश क्र.फेरचौकशी अर्ज क्र.२६२/२०२१ दिनांक १८/१०/२०२१ अपिल अर्ज.

अपिलार्थी व सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील अपिल अर्जाची सुनावणी मा.अपर आयुक्त, कोंकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक १२/०४/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

तरी वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीलामार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्ता मार्फत हजर रहावे. वरील तारखेस आपण हजर न राहिल्यास सदरहू अपिल अर्जाचे कामी आपणांस काही सांगणे नाही असे समजून योग्य तो हुकूम करण्यात येईल.

**सही/-**
**(धनंजय कांबळे)**
**नायब तहसीलदार (अपिल)**
**अपर आयुक्त, कोंकण विभाग करिता**



## माणगांव नगरपंचायत, माणगांव

ता.माणगाव, जि.रायगड, पिनकोड ४०२१०४ Email : nagarpanchayatmangaon@gmail.com, फोन नं.०२१४०२६३०५६

जा.क्र./मानपं/जा.नि./६६४९/२०२१-२०२२ — दिनांक : २३/०३/२०२२

### जाहीर निविदा / जाहीर फेरनिविदा सूचना

निम्ननिर्देशित कामाकरिता इच्छुक ठेकेदारांकडून दोन लखोटा पद्धतीने सिलबंद निविदा खाली नमूद कालावधी पर्यंत मागविण्यात आले आहेत. कोरी निविदा मागणी अर्ज खाली नमूद कालावधीपर्यंत लेखी स्वरुपात माणगांव नगरपंचायत कार्यालयात कोरी निविदा पत्राची फी (ना परतावा) भरुन मिळू शकतील. निविदा फॉर्म करिता माणगांव नगरपंचायत कार्यालयात संपर्क साधावा.

| अ.क्र. | कामाचे नांव | कालावधी | इसारा रक्कम | निविदा विक्रीची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | माणगांव नगरपंचायत हद्दीमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत बॅनर छपाई करणे. (फेरनिविदा) | दि.२४/०३/२०२२ ते दि.३०/३/२०२२ | ५०००/- | १०००/- |
| २ | माणगांव नगरपंचायत हद्दीमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान IEC अंतर्गत उपक्रम राबविणे. (फेरनिविदा) | दि.२४/०३/२०२२ ते दि.३०/३/२०२२ | २०००/- | ५००/- |
| ३ | स्वच्छ महाराष्ट्र IEC अंतर्गत टी-शर्ट छपाई करणे. (फेरनिविदा) | दि.२४/०३/२०२२ ते दि.३०/३/२०२२ | २०००/- | ५००/- |
| ४ | माणगांव नगरपंचायत हद्दीतील उतेखोल आदर्श समता नगर येथील महिला व्यायामशाळा भाडेतत्वावर देणे. (फेरनिविदा) | दि.२४/०३/२०२२ ते दि.३०/३/२०२२ | २०००/- | ५००/- |
| ५ | माणगांव नगरपंचायतीचे जलशुद्धीकरण केंद्र व पंप हाऊस येथील पंपाची देखभाल व दुरुस्ती करणे. (फेरनिविदा) | दि.२४/०३/२०२२ ते दि.३०/३/२०२२ | ५०००/- | १०००/- |
| ६ | माणगांव नगरपंचायत पाणी पुरवठा विभागाकरिता आवश्यक साहित्य पुरवठा करणे. (फेरनिविदा) | दि.२४/०३/२०२२ ते दि.३०/३/२०२२ | ५०००/- | १०००/- |
| ७ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत माणगांव नगरपंचायत हद्दीमध्ये भितींचित्रे रंगविणे | दि.२४/०३/२०२२ ते दि.३०/३/२०२२ | ५०००/- | १०००/- |

कामाच्या अटी व शर्ती

वरील अ.क्र.१ ते ७ कामांच्या निविदा बाबतची अटी, शर्ती व निविदा फॉर्म माणगांव नगरपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.

**सही/-** **मुख्याधिकारी** **माणगांव नगरपंचायत**

**सही/-** **उपनगराध्यक्ष** **माणगांव नगरपंचायत**

**सही/-** **नगराध्यक्ष** **माणगांव नगरपंचायत**


पृष्ठ क्र.१ वरुन...

# जिल्हा पुरवठा शाखेकडून पुरवठाविषयक बाबींसंदर्भात कार्यशाळेचे आयोजन

सेवा देऊ शकतात. बँकांचे सर्व व्यवहार, रेल्वे विमान तिकिट बुकिंग, सर्व प्रकारचे बिल्स उदाहरणार्थ लाईट बिल, फोन बिल, पाणी बिल, Health Care Services, मोबाईल, डीटीएच रिचार्ज, शेतीविषयक सर्व सेवा, इन्कम टॅक्स रिटर्न भरणे, नवीन रेशन कार्ड, दुबार रेशन कार्ड, नावामध्ये दुरुस्ती अर्ज इत्यादी या संदर्भात देखील चर्चा करण्यात येणार आहे.

राज्यातील रास्त भाव दुकानदार यांचे आर्थिक स्त्रोत वाढविण्याच्या दृष्टीकोनातून राज्य शासनाने उचललेले हे महत्वाचे पाऊल आहे. त्यानुषंगाने व इतर बाबी संदर्भात कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तरी या जिल्हास्तरीय कार्यशाळेस जिल्हयातील सर्व रास्त भाव धान्य दुकानदार, पेट्रोल पंप व डिझेल पंप धारक, एल.पी.जी. गॅस वितरक, खादयतेल व खादयतेलबियांचे व्यापारी, शिवभोजन केंद्र चालक/ मालक, ऑईल कंपन्याचे जिल्हा संघटक व असिस्टंट मॅनेजर, तालुका पुरवठा शाखेतील अधिकारी, कर्मचारी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## ढगाळ वातावरणाचा फळ बागायतदारांना मोठा फटका

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

वातावरणात चार ते पाच दिवसांपासून मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या ढगाळ वातावरणामुळे रायगड जिल्ह्यासह रोहा तालुक्यातील फळबागायतदारांना फटका बसला असून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या ढगाळ वातावरणामुळे आंबा व काजूला भरभरून आलेला मोहोर हा संपुर्ण गलती होण्याच्या मार्गावर लागला आहे. त्यामुळे फळबागायतदारांच्या हातातोंडाशी आलेला घास हा हाता–तुन निसटुन गेल्यामुळे बागायतदारांना अक्षरशः डोक्याला हात लावून बसण्याची वेळ आली आहे.

बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्यामुळे सद्यस्थितीत वातावरणात मोठे बदल झा–लेले दिसून येत आहेत. दिवसभर राहणा–या ढगाळ वातावरणामुळे तयार झालेल्या फळबागांना यांचा मोठा फटका बसत आहे. आंबा, काजु तसेच इतर फळझाडांना आलेला मोहोर पुर्णतः खाली जमिनीवर पडुन जिकडे–तिकडे विखुरलेल्या अवस्थेत पहावयास मिळत आहे. तसेच भाज्यांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही फळबागांचे अतोनात नुकसान झाल्यामुळे यापुढे फळबागांचे उत्पादन करायचे की नाही असा प्रश्न फळबागायतदारांना पडला आहे. दरम्यान या फळबागांच्या नुकसानीचे पंचनामे शासन स्तरावर तातडीने करून फळबागायतदारांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे.

## झेंडा सामाजिक संस्था व दिशा महिला मंचतर्फे रस्सी उड्या स्पर्धेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

झेंडा सामाजिक संस्था व दिशा महिला मंच आयोजित रस्सीउड्या स्पर्धेचे आयोजन शंकर मंदिराजवळ करण्यात आले होते. कुटुंबाची जबाबदारी थोडीशी बाजूला सारून पुन्हा आपल्या बालपणाची आठवण व्हावी व नकळतपणे स्वतःचा फिटनेसही व्हावा या उद्देशाने या आगळ्या वेगळ्या स्पर्धेचे आयोजन कामोठे येथे करण्यात आले होते जवळपास ५५ माहिलांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.

तीन गटा मध्ये ही स्पर्धा घेण्यात आली १८ ते ३० या वयोगटामध्ये प्रथम आश्लेषा बेलकर ,द्वितीय कोमल पवार तर तृतीय ममता सावंत आणि ३१ ते ४५ या वयोगटामध्ये प्रथम मनिषा मोरे, द्वितीय स्नेहल चेलेकर तर तृतीय वैशाली वाफारे व ४५ ते ६० या वयोगटामध्ये प्रथम अनिता खटावकर ,द्वितीय ख़ुशी सावर्डेकर तर तृतीय क्रमांकाने विजेत्या झाल्या. या स्पर्धेसाठी आमदार मा.प्रशांत ठाकूर प्रमुख उपस्थित होते अशा आगळ्या वेगळ्या स्पर्धेचे व आयोजकांचे कौतुक करत झेंडा व दिशा संस्थेला पुढील वाटचालीस त्यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच जोशी होम चे बिल्डर रवींद्र जोशी यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वी झाला मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरणचा कार्यक्रम पार पडला.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


Hon'ble Godase Madam

Adv.Prashant Malik

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (SENIOR DIVISION), PANVEL, AT PANVEL

Miscellaneous Application No.934 of 2022

Exh : 7/D

Next Date : 27/04/2022

Mrs.Kamini Venkata Subbarao Gavara,
Age about : 34 years,
Residing at B/2202, Mahaveer Herigate,
Plot No.3, Sector 35 G, Kharghar — Applicant

Whereas MR SUBBARAO VENKATA GAVARA who died on 11/12/2020 at Krishna Institute of Medical Sciences, Secunderabad (Telangana State).

Therefore, MRS KAMINI VENKATA SUBBARAO GAVARA and MASTER LUVISH VENKATA SUBBARAO GAVARA are the legal heir and representative of MR SUBBARAO VENKATA GAVARA, that the wife of the deceased has made on application to transfer the properties as mentioned in the schedule below of MR SUBBARAO VENKATA GAVARA in his name. Therefore this Hon'ble Court invites any claims / objection from heirs/ claimants / objectors within a period of 30 days from the issuance of this notice, with copies of relevant proofs to support the claims / objection. If no claims or objection are received within the prescribed period, the court shall be at liberty to deal with the shares and interests of the deceased member as per the relevant law.

**SCHEDULE**

Name : MR SUBBARAO VENKATA GAVARA

**Immovable Property :**

A) Unit No 1401, 3BHK on 14 th floor in Tower Alexander admeasuring carpet area of 95.23 sq mtrs with additional usable area of 18.39 sq mtrs (Gross usable area 113.62 sq mtrs) in project titled as "Sai Word Empire" Phase 1 situated at-Survey No / CTS No 93/3, 93/2 & 4, 94/1, 94/52, 94/3A, 94/3B, 94/4, .... Lying and being at Village Rohinjan, District Raigad, Maharashtra.

Valued at Rs.1,27,52,000/- (Rupees One Crores Twenty Seven Lakhs Fifty Two Thousand Five Hundred Only).

Given under my hand and seal on this 22/03/2022

| Sd/- Clerk Civil Court (S.D.), Panvel | Court Seal | Sd/- Superintendent Civil Court (S.D.), Panvel |
|---|---|---|

# चरई बुद्रुक ग्रामदैवत सोमपद्मावती पालखी सोहळा उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । तळा**



तळा तालुक्यातील चरई बुद्रुक येथे सालाबादप्रमाणे ग्रामदैवत सोमपद्मावती पालखी सोहळा व रायगडावरून आणलेली शिवज्योत, शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शिवजन्मोत्सवच्या पाश्वभुमीवर तरुणांनी रायगडावरून चरई बुद्रुक येथे पाई चालत आणलेली शिवज्योत सह बहुजन प्रतिपालक रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पालखी सह ग्रामदैवत सोमपद्मावती पालखी, शिवज्योत यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

प्रेरणादाई पोवाडे स्फुर्ती गीतांच्या जल्लोषात लहान थोर आबालवृद्ध महिला हातात लेझीम, भगवे झेंडे घेऊन नाचत होते. वाजत–गाजत भगव्या झेंड्यांच्या डौलदार रुबाबात जय भवानी जय शिवराय गावदेवी माते की जय हर हर महादेव अशा गगनभेदी घोषणा देत भव्य मिरवणूक काढण्यात आली. या सोहळ्या निमित्ताने चरई बुद्रुक मधील महिलांनी सर्व गावात रस्त्याच्या दुतर्फा सुंदर सुबक रांगोळ्या काढल्या होत्या.

ग्रामदैवत सोमपद्मावती पालखी, शिवजन्मोत्सव सोहळ्यात चरई बुद्रुक ग्रामस्थ मंडळ, मुंबई मंडळ, महिला मंडळ, आबालवृद्ध, लहान थोर मंडळी सहभागी झाली होती. सदर हा सोहळा यशस्वी करण्यासाठी मुंबई मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र गंभीर, उपाध्यक्ष मनोहर काप, सचिव सुरेन्द्र काप, सहसचिव निलेश म्हसकर, सल्लागार अनिल काप, अनंत तांदळेकर ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष नामदेव काप, उपाध्यक्ष लक्ष्मण शिंदे, सचिव सतिश शेपोंडे, सहसचिव दत्ताराम काप, खजिनदार दिनेश काप महिला मंडळ अध्यक्ष सौ.दर्शना घागरूम, उपाध्यक्ष सौ.प्रियांका जाधव, सचिव सौ.योगिता पतारे, खजिनदार सौ.दिशा काप तसेच सर्व तरुण इत्यादींनी अहोरात्र अथक परिश्रम घेतले.

# ऐन उन्हाळ्यात धामोळे ग्रामस्थांचा पाण्यासाठी टाहो

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर शहराला लागून असलेल्या धामोळेगावातील नागरिकांना सध्या ऐन उन्हाळ्यात तीव्र स्वरुपाच्या पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. या गावात आजही टँकरने पाणी येत असल्याने पाणी भरण्यासाठी टँकरसमोर नागरिकांची गर्दी होतांना दिसत आहे. या समस्येकडे संबंधित यंत्रणेचे पूर्णतः दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.

खारघर शहराला लागून असलेल्या व पनवेल महापालिकेच्या हद्दीतील धामोळे गावातील नागरिकांना पाण्यासाठी गेल्या काही वर्षापासून संघर्ष करावा लागत आहे. आजही टँकरने तेथे पाणी आणावे लागत आहे. तसेच चार दिवसांतून एकदा टँकर येत असल्याने एकदा का गावात पाण्याचा टँकर आला की, या टँकरसमोर पाणी भरण्यासाठी महिला वर्गाची एकच गर्दी होत असते. गेल्या काही वर्षापासून याठिकाणच्या ग्रामस्थांना या समस्येला तोंड द्यावे लागत असल्याने हक्काच्या पाण्यासाठी नागरिकांना टाहो फोडावा लागत आहे. सध्या ऐन उन्हाळ्यात ही समस्या अधिक उग्र रूप धारण करू लागली असून पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना संघर्ष करावा लागत आहे. हा जर प्रकार असाच सुरु राहिला तर प्रशासनाला नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागणार आहे. गेल्या अनेक वर्षापासूनची ही समस्या निकाली काढण्यासाठी संबंधित शासकीय यंत्रणांनी याबाबत लवकर तोडगा काढावा, अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे.

# उधारीच्या पैशावरुन मित्रांमध्ये हाणामारी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उसने दिलेल्या पैशांची मागणी केल्याच्या रागातून मित्रानेच आपल्या मित्राला इतर तीन मित्रांच्या मदतीने बेदम मारहाण करुन पलायन केल्याची घटना कळंबोलीत घडली. कळंबोली पोलिसांनी या प्रकरणी चौघा आरोपींविरोधात मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे.

सदर घटनेतील जखमी विशाल आहेर (३२) कळंबोलीत राहण्यास असून त्याचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय आहे. तर प्रमुख आरोपी शरद ढोले देखील कळंबोलीत राहण्यास असून तो विशालचा मित्र आहे. दोन आठवड्यापूर्वी विशालने शरदला हातऊसने ५०० रुपये दिले होते. त्यानंतर विशाल त्याला फोन करुन आपल्या पैशांची मागणी करत होता. मात्र, शरद त्याचा फोन उचलत नव्हता. धुलीवंदनाच्या दिवशी रात्री विशाल त्याच्या मित्रासोबत कळंबोलीतील बारमध्ये दारु पिण्यासाठी गेला असताना, तेथे शरद ढोले देखील त्याचा मित्र हिरामन बेलोटे याच्यासह दारु पिण्यासाठी गेला होता. यावेळी विशालने त्याच्याकडे उसने पैशांबाबत विचारणा केल्यानंतर त्यांच्यामध्ये वादावादी झाली.

त्यामुळे बार मालकाने त्यांना बाहेर काढल्यानंतर त्यांच्यामध्ये धक्काबुक्की आणि शिवीगाळी झाली. त्यानंतर हिरामन याने फोन करुन आपल्या मित्रांना बोलावून घेतले.

काही वेळानंतर सदर ठिकाणी स्कॉर्पीओमधून दोन अनोळखी व्यक्तींनी तसेच शरद आणि हिरामन या चौघांनी विशाल आणि उस्मान या दोघांना लाथा–बुक्क्यांनी आणि कमरेच्या पट्ट्याने बेदम मारहाण केली.

या मारहाणीत विशाल जखमी झाल्यानंतर चौघा मारेकऱ्यांनी तेथून पलायन केले. त्यानंतर विशालने कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी मारहाण करणाऱ्या चौघांविरोधात गुन्हा दाखल करुन त्यापैकी शरद ढोले, हिरामन बेलोटे या दोघांना अटक केली आहे.

# मार्च अखेरीस भारतीय काँग्रेसच्या वतीने पन्नास हजार डिजिटल सदस्य नोंदणीचे ध्येय पूर्ण करणार : महेंद्र घरत

**दै.रायगड नगरी । माथेरान**

देशात काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पक्ष बळकटी साठी तळागाळातील लोकांना काँग्रेसचे सामाजिक हिताचे महत्त्व पटवून देण्यासाठी पक्षात अधिकाधिक कार्यकर्त्यांची डिजिटल सदस्य नोंदणी व्हावी यासाठी या अभियानाचाआढावा बैठकीचा कार्यक्रम पनवेल तालुक्यातील उलवे नोडे येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स च्या सभागृहात मंगळवार दिनांक २२ मार्च रोजी कोकण विभागाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होता.

यावेळी कोकण विभागांमध्ये तेरा संघटना जिल्ह्यांचा समावेश होतो. त्यावेळी सर्व जिल्हाध्यक्ष यांनी आपापल्या परीने डिजिटल नोंदणी करण्याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. मार्च अखेर पर्यंत हा महत्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येणार असल्याने रायगड जिल्ह्यात भारतीय काँग्रेसच्या वतीने पन्नास हजार डिजिटल सदस्य नोंदणीचे ध्येय आपण पूर्ण करणार असे रायगड काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी उपस्थित मान्यवरांच्या समोर नमूद केले. यावेळी व्यासपीठावर समन्वयक डिजिटल नोंदणी राहुल साळवे,रायगड च्या प्रभारी चारुलता टोकस, पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या प्रभारी हुस्न बानो खलिफे,राणी अगरवाल, प्रमोद मोरे,राजन भोसले, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र घरत, पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष भाई आर सी घरत, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष कॅप्टन कलावत आदी मान्यवरांच्या सह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या आढावा बैठकीला राजस्थान मधील आमदार कृष्णा पुनिया यांची सुध्दा प्रमुख होती.

रायगड काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी उत्तम प्रकारे या आढावा बैठकीसाठी नियोजन केले होते.ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे सचिव, या अभियानाचे कोकण प्रभारी बी एम संदीप,कृष्णा पुनिया, अभियानाचे राज्य समन्वयक आमदार प्रणिती शिंदे, भाई नगराळे, काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष तथा कोकण विभागाचे प्रभारी नसीम खान यांनी यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.



मा.मुजावर साहेब

**ॲड.शेखर खोपकर**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.३८०/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.२७/०४/२०२२

१) श्रीमती.बेबी भगवान भगत
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्रीमती.रुपाली समीर पाटील
वय : ३५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घोट, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.सोनम नरेंद्र भोपी
वय : ३२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.हरिग्राम, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्रीमती.पुनम अमोल घरत
वय : ३१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बेलपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
५) श्रीमती.पुजा संतोष पाटील
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.आकुर्ली, ता.पनवेल, जि.रायगड
६) श्रीमती.आरती भगवान भगत
उर्फ आरती मयुरेश म्हात्रे
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.हाऊस नं.५०२, ५०३, रुम नं.४०१,
शंकर मंदिराजवळ, सेक्टर नं.५, सानपाडा, नवी मुंबई
७) श्रीमती.सुचिता रुपेश भगत
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
८) कु.कार्तिक रुपेश भगत
वय : १५ वर्षे, धंदा : शिक्षण
क्र.८ अ.पा.क.करिता क्र.७ आई म्हणून
क्र.१, ७ व ८ रा.सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती, अर्जदार क्र.२ ते ६ यांचे वडील, अर्जदार क्र.७ यांचे सासरे व अर्जदार क्र.८ यांचे आजोबा मयत भगवान दिनकर भगत हे मौजे : सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड येथे दि.०१/०५/२०२१ रोजी मयत झाले आहेत. मृत्यूसमयी मयत भगवान दिनकर भगत व मालकीची सोन्याची गंठण असून सदरील सोन्याची वस्तू सध्या तामिळनाड मर्कन्टाईल बँक लि. शाखा पनवेल यांचेकडे लोन अकाऊंट नं.२९३७००३००१००७४९ अन्वये जमा आहे. या चल मिळकती संबंधात मयत भगवान दिनकर भगत यांचे मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी अर्जदार यांचे क्लेम संबंधात जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला प्रदान करण्यात येईल, हे सर्व कळावे.

ही नोटीस आज दि.२२/०३/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

| सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

प्रो.जमा १००

**अर्जदारातर्फे वकील**
**श्री.अनिल वि. कर्णिक**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात, पनवेल

दि.चौ.अर्ज नं.१९२/२०२२

नि.नं.९/ड

ने.ता.२८/०४/२०२२

१) श्रीमती.निरुनिसा अब्दुल सत्तार पटेल
वय : ४९, धंदा : गृहिणी
पत्ता : घर नं.११०३, बाग मोहल्ला, ताज राईस जवळ,
तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.तनजीम हजीमीया पटेल
वय : २७ वर्षे, धंदा : गृहिणी
पत्ता : घर नं.८६, वरचा मोहल्ला, तळोजा पाचनंद,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती आणि अर्जदार क्र.२ यांचे वडील पै.अब्दुल सत्तार अब्दुल रज्जाक पटेल यांचे घर नं.११०३, बाग मोहल्ला, ताज राईस जवळ, तळोजा पाचनंद, तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड येथे दि.१७/०६/२०२० रोजी निधन झाले आहे. अर्जदार क्र.१ ही पै.अब्दुल सत्तार अब्दुल रज्जाक पटेल यांची पत्नी असून अर्जदार क्र.२ ही पै.अब्दुल सत्तार अब्दुल रज्जाक पटेल यांची मुलगी आहे व तेच त्यांचे एकमेव वारस आहेत. पै.अब्दुल सत्तार अब्दुल रज्जाक पटेल यांच्या मृत्यूसमयी खालील वर्णनाच्या मिळकती होत्या व आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

**अ) मौजे : तळोजा पाचनंद, तहसील–पनवेल, जि.रायगड, महानगरपालिका येथील गावठाण हद्दीतील मिळकत क्र./घर क्र.११०३, तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जिल्हा परिषद–रायगड यांच्या हद्दीतील मे.सह–दुय्यम निबंधक–पनवेल यांच्या स्थळसिमेतील व अधिकार क्षेत्रातील लोड बेरिंग पक्के घर व घराचे एकूण बांधीव क्षेत्रफळ ९७.६ चौ.मी.**

**ब) मौजे : ममदापूर, ता.कर्जत, जि.रायगड येथील कर्जत पंचायत समिती आणि ममदापूर ग्रामपंचायतीच्या हद्दीतील बिल्डींग नं.१, ''सौशिल्या'' या इमारतीमधील, दुसऱ्या मजल्यावरील, निवासी सदनिका नं.२०२, क्षेत्र २५.५१८ चौ.मी. (चटई क्षेत्र)**

वर नमूद केलेल्या मिळकतींपैकी परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेली मिळकत ही पै.अब्दुल सत्तार पटेल यांनी दि.२०/०७/२०१९ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीखताने सौ.समिना जहूर पटेल, रा.घर नं.१२५, भाटीला रोड, अक्सा मस्जिद जवळ, तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड यांचेकडून विकत घेतली होती. तसेच वर नमूद केलेल्या मिळकतींपैकी परिशिष्ट ब मध्ये नमूद केलेली मिळकत ही पै.अब्दुल सत्तार पटेल यांनी दि.०२/०९/२०१९ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीखताने सिल्वर लिफ रिअल्टी भागीदारी संस्था तर्फे भागीदार श्री.रमेश भचू वाविया, पत्ता : ऑफिस नं.९०९, प्लॉट नं.१९/२०, पाम बीच रोड, सेक्टर १९ ड, वाशी, नवी मुंबई यांचेकडून घेतली होती. सदरील अर्जदार क्र.१ व २ हे इंडियन सक्सेशन ॲक्ट मधील तरतुदींनुसार पै.अब्दुल सत्तार पटेल यांचे कायदेशीर वारस असून त्यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या परिशिष्ट अ व ब मध्ये नमूद केलेल्या मिळकती होत्या त्या मिळकतींचे उत्तराधिकारी आहेत. सबब त्याप्रमाणेचा दाखला ना.न्यायालयाकडून मिळणेकरिता अर्जदार क्र.१ व २ या सक्षम व्यक्ती असून पात्र आहेत. तसेच अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही अन्य व्यक्ती पै.अब्दुल सत्तार पटेल यांचे उत्तराधिकारी व वारस म्हणून हक्क सांगण्यास पात्र नाहीत. पै.अब्दुल सत्तार पटेल यांच्या निधनानंतर अर्जदार क्र.१ व २ यांना वर नमूद केलेल्या परिशिष्ट अ व ब मध्ये नमूद केलेल्या मिळकतींच्या संबंधात त्यांची नावाची नोंद पै.अब्दुल सत्तार पटेल यांचे उत्तराधिकारी या नात्याने संबंधित खात्याकडून होवून मिळणेकरिता सदरचा वारस दाखला मिळणेसाठीचा अर्ज मे.न्यायालयात दाखल करावा लागत आहे. सदर नमूद मिळकतींमध्ये सदर वारस / उत्तराधिकारी हक्कासंबंधी कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्या व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा वकीलांमार्फत या न्यायालयात हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीत व मुदतीत हरकती न आल्यास मे.न्यायालय अर्जदार यांच्या हक्कांबद्दल पुरावा घेण्याची कायदेशीर कारवाई करेल व अर्जदार क्र.१ व २ यांना अर्जात नमूद केलेल्या मिळकतीसंबंधात सदरचा अर्ज मंजूर करून पै.अब्दुल सत्तार पटेल यांचे उत्तराधिकारी म्हणून सक्सेशान सर्टीफिकेट पारीत करेल.

सदर नोटीस आज दि.१८/०२/२०२२ रोजी न्यायालयाचे सही शिक्क्यानिशी दिली.

| सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

Before J. Smt. A.A.Godase (CJSD)

Advocate for Applicant
Adv. A.A.Sawant

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (SENIOR DIVISION), PANVEL, AT PANVEL

Miscellaneous Civil Application No.397 of 2022

Exh : 7/D

Next Date : 29/04/2022

1) Mr.Subramanyan Padmanabhan
S/o P.Subramanyan and Meenakshy S.
Age : 75 years, Occupation : Retired
Current Residing at : 208/B/5653,
Anita-Kutir CHS, 90 Feet Road,
Near R. Odeon Mall, Pant Nagar,
Ghatkopar (East), Mumbai-40075
Permanent Address at : Villa 54, Serence
Shenbagam Siruvani Main Road,
Madhampatti, Coimbatore 641010
2) Mrs.Jayanthi Gopalakrishnan
Wife of Mr.C.R.Gopalakrishnan
D/o P.Subramanyan and Meenakshy S.
Age : 72 years, Occupation : Retired
Address : 208/B/5653,Anita-Kutir CHS,
90 Feet Road, Near R. Odeon Mall,
Pant Nagar, Ghatkopar (East), Mumbai-40075
3) Mr.Prakash Iyer
S/o P.Subramanyan and Meenakshy S.
Age : 68 years, Occupation : Service
Residing at : E1601, Kumar Prince Town
Apartment, Shettihalli Main Road,
Shettihalli, Bangalore North, Bengaluru,
Jalahalli West, Karnataka-560015 — Applicants

That Late Mrs Meenakshy Subramanyam who was the mother of Applicants died in Coimbatore at the Applicant no.1's house on 13.05.2019 and Late Mr.Shivkumar Iyer who was the brother of the Applicants expired on 26.01.2021.

**The description of the properties of the said deceased are as follows :-**

1) "Immovable property, a residential flat admeasuring 732 sq. ft. bearing Flat no.304, 3 rd Floor, Pratik Plaza CHS, lying, being and situate on plot no.63, Sector 21, Kamothe, Phase-II, Taluka-Panvel, District-Raigad (hereinafter referred to as the said property) and within the jurisdiction of Panvel Municipal Corporation.

Whereas the abovenamed applicants have filed Misc. Application for heirship certificate under the provisions of Bombay Regulation Act, in the Court of Civil Judge (Senior Division), Panvel.

You the members of public are hereby given notice to appear in the Court of Civil Judge (S.D.), Panvel, in person or by pleader duly instructed and to file your Say / Objection if any within 30 (thirty) days from the date of publication of this public notice. Failing which the said application will be heard presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hand and seal of the Court on this 23 rd day March 2022

Place : Panvel

Date : 23.03.2022

| Sd/- Jr.Clerk Civil Court (S.D.), Panvel | Court Seal | Sd/- Asst.Superint. Civil Court (S.D.), Panvel |
|---|---|---|

# दीपाली सय्यद यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वच्छता दूतांचा सन्मान सोहळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९१ व्या जयंतीनिमित्त शिवसेना, युवासेना आणि महिला आघाडी सेनेतर्फे शिवजयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सकाळी येथील जेष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी यांच्याहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आल्यानंतर प्रसिद्ध अभिनेत्री तथा शिवसेनेच्या स्टार प्रचारक दीपाली सय्यद - भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत कोरोना काळात स्वच्छता दूत ठरलेल्या महिला सफाई कामगारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शिवसेनेच्या महिला आघाडीच्यावतीने आयोजित हळदीकुंकू समारंभाला परिसरातील महिलांनी मोठी गर्दी केली होती. सकाळी ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते शिवरायांच्या पुतळ्याला अभिवादन करून शिवजयंतीला सुरुवात करण्यात आली असून यावेळी प्रसिद्ध अभिनेत्री दिपाली भोसले - सय्यद, शिवसेनेचे पनवेल तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल आदींसह मान्यवरांनी श्रीमंत छत्रपती शिवरायांचे मनोभावे दर्शन घेतले.



छत्रपती शिवरायांनी ज्या पद्धतीने समाजातील कर्तृत्ववान मावळे शोधले आणि त्यांना स्वराज्याचे साक्षीदार होण्याचे भाग्य मिळवून दिले, त्यांच्याच या विचारांना आचरणात आणून येथे शिवसेनेच्या वतीने परिसरातील नागरिकांचे आरोग्य उत्तम राहावे म्हणून अहोरात्र झटणाऱ्या या स्वच्छता दूत महिलांचा सन्मान अभिनेत्री दीपाली सय्यद यांच्याहस्ते करून त्यांच्या कार्याला सलामी देण्यात आली. तसेच परिसरातील नागरिक आणि शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान सोहळा सुद्धा यावेळी मोठ्या दिमाखात पार पडला. शिवजयंतीनिमित्त खास आकर्षण म्हणजे महिलांसाठीचा होम मिनिस्टर हा पैठणीचा खेळ आणि त्याचसोबत अभिनेत्री दिपाली सय्यद यांची प्रमुख उपस्थिती असल्यामुळे महिलांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेवून या कार्यक्रमाचा आनंद घेतला.

यावेळी अभिनेत्री दिपाली सय्यद यांनी महिलांना मार्गदर्शन करताना सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून महिलांच्या न्याय हक्कासाठी आम्ही लढत आहोत, डीबीएस चॅरिटेबल संस्थेच्यावतीने अनेक प्रश्न आपण हाताळून मार्गी लावले आहेत. आज आपली संस्था महाराष्ट्रातील प्रमुख पक्ष असलेल्या शिवसेनेसोबत काम करीत आहे. आणि या शिवसेना पक्षांतर्गत असलेल्या संस्थेच्या माध्यमातून समाज माध्यमांमधील अनेक प्रश्न मार्गी लागणार आहेत, त्यामुळे महिलांनी मोठ्या संख्येने या संस्थेशी पर्यायाने शिवसेनेशी जोडले गेले पाहिजे. तसेच संस्थेशी जोडल्या गेलेल्या प्रत्येक सदस्यांनी पक्षवरहित काम करून आपल्या कामाने आपण आपल्या सखी मैत्रिणींना न्याय मिळवून देवून त्यांच्याशी आपलेपणा जागविला पाहिजे, यासाठी या कार्यक्रमांमध्ये आपण जिल्हा पदाधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. आपल्याला कोणताही त्रास झाला तर त्याचे उत्तर हे महिला दक्षता पथक करेल ही ग्वाही मी आज देत आहे.

## संक्षिप्त...

### कर्जत तालुक्यातील नळ पाणी पुरवठा योजनेला तात्काळ मंजुरी देण्याचे आदेश



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत विधानसभा आमदार महेंद्र थोरवे यांच्या विशेष प्रयत्नातून जलजीवन मिशन योजनेअंतर्गत सादर केलेल्या प्रस्तावांना तात्काळ मंजूरी देण्याचे आदेश पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी सचिव यांना दिले आहे. यात खालील नळ पाणी पुरवठा योजनांचा समावेश आहे.

पेठ नळ पाणी पुरवठा योजना ता.कर्जत -४७.१३ (लक्ष), नांगुर्ले नळ पाणी पुरवठा योजना ता.कर्जत-५६.४७ (लक्ष), भातगाव नळ पाणी पुरवठा योजना ता.कर्जत-२४.९७(लक्ष), चेवणे नळ पाणी पुरवठा योजना ता.कर्जत-८४.१३ (लक्ष), मुगपे नळ पाणी पुरवठा योजना ता.कर्जत-३५.१७(लक्ष),आणि खांडस नळ पाणी पुरवठा योजना ता.कर्जत-५०.३५ (लक्ष)

# मुलीला धमकी देऊन लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीस पाच वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील शिळोशी गावात सात वर्षे तीन महिने वर्षे वयाच्या चिमुरडीवर धमकी देऊन लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीस पाच वर्षे सश्रम कारावास व दहा हजार दंडाची शिक्षा आणि दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावासाची सोमवारी विशेष सत्र न्यायाधीश माणगाव यांनी सुनावली आहे.

या संदर्भात सविस्तर माहिती अशी की १ एप्रिल २०२१ रोजी या अल्पवयीन मुलीचे कुटुंबीय हे कामधंद्या करिता बाहेर गेले असता घराच्या ओटीवर ही अल्पवयीन मुलगी खेळत होती. घरात कोणी नाही याचा फायदा घेऊन दुपारी ३ ते सायंकाळी ६ च्या दरम्यान या मुलीला शेजारी राहणारा आरोपी मोहन धोंडू शिर्के (वय.४५) रा. शिळोशी याने त्याच्या घरामध्ये नेऊन खाऊचे प्रलोभन दाखवून मुलीवर लैंगिक अत्याचार केला. ही बाब मुलीने घरच्यांना सांगितल्यावर पाली पोलिस स्थानकामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित साबळे यांनी केला. आरोपी मोहन धोंडे शिर्के यास भादविस कलम ३५४ सह बाल लैंगिक अपराधा पासून बालकांचे संरक्षण अधिनियम १० व १२ प्रमाणे गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवण्यात आला. या खटल्याची सुनावणी विशेष सत्र न्यायालय माणगाव रायगड येथे झाली. सदर गुन्ह्याच्या कामी अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील योगेश तेंडुलकर यांनी काम पाहिले. याकामी पीडित मुलगी व फिर्यादीची साक्ष न्यायालयात महत्त्वाची ठरली. या केसमध्ये अभियोग्य पक्षास पैरवी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण धुमास्कर, पोलीस हवालदार छाया कोपनर व शशिकांत कासार, पोलीस शिपाई, सुनील गोळे, सोमनाथ ढाकणे यांनी मदत केली. याकामी अभियोग पक्षातर्फे ऍड. योगेश तेंडुलकर यांनी वरिष्ठ न्यायालयाच्या महत्त्वाचे निर्णय दाखल केले. सदर साक्ष व न्यायनिर्णयाच्या आधारे विशेष सत्र न्यायाधीश माणगाव पी. पी. बनकर यांनी निर्णय दिला.

# नवीन पनवेल पोलीस चौकीची दुरावस्था, कागदपत्रे जळाली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल येथील शिवा कॉम्प्लेक्सजवळील पोलीस चौकीची दुरावस्था झाली आहे. चौकितील भिंतीना तडे गेलेले असल्यामुळे आणि चौकित सर्व वस्तु अस्ताव्यस्त व तुटलेल्या असल्याने पोलिसांना बसण्यासाठी देखील जागा शिल्लक राहिलेली नाही. जनतेच्या सुरक्षेसाठी दिवसरात्र काम करणार्या पोलिसांनाच बसायला जागा नाही. त्यामुळे चौकीच्या बाहेर खुर्ची टाकून बसण्याची पाळी त्यांच्यावर आली आहे.



खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या अंतर्गत असलेल्या नवीन पनवेल येथील शिवा कॉम्प्लेक्सच्या पोलीस चौकीची अतिशय दुरावस्था झालेली असुन ठिकठिकाणी भिंतीना तडा गेले आहेत. या पोलीस चौकीचा उद्घाटन समारंभ २ ऑक्टोबर २००६ रोजी तत्कालीन नवी मुंबई परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त प्रवीण पवार यांच्या हस्ते झाले होते. मात्र सद्यस्थितीत या पोलीस चौकीची अवस्था दयनीय झाली आहे. चिपळे, विहिघर, आकुर्ली, सुकापूर आदी गावाच्या परिसराचा संबंध या पोलीस चौकीशी येतो. याच भागात अनेक बांधकाम व्यावसायिकांनी ग्राहकांची करोडो रुपयांची फसवणूक केली आहे. त्यामुळे ग्राहक तक्रार करण्यासाठी मोठ्या आशेने या चौकीत येतो, मात्र चौकीची अवस्था पाहून पुन्हा या चौकीत येत नसल्याचे अनेक नागरिक सांगतात. चौकितील खिडकी, काचा फूटलेल्या अवस्थेत आहेत. तर कागदपत्रे जळाली आहेत. येथील पत्रे देखील फुटुन खाली पडलेले आहेत. खुर्ची, कागदपत्रे, कचरा सगळे अस्तव्यासत्व पडलेले दिसून येत आहे. त्यामुळे येथे पोलिसांनाच बसायला जागा नाही. यापूर्वी येथे याठिकाणी एक उपनिरीक्षक, आणि तीन-चार पोलीस कर्मचारी असे जवळपास पाच ते सहा कर्मचारी काम करत असत.

पावसाळा काही महिन्यांवर आला आहे, त्यामुळे एखादी दुर्घटना घडण्याआधी या चौकीची डागडुजी करण्यात यावी अशी मागणी केली जात आहे. चौकीची झालेली दुरवस्था पाहून येथे कोणीही फिरकत नाहीत. तक्रार करणारे नागरिक किंवा चौकशीसाठी आलेल्या नागरिकाना रिक्षा भाडे देऊन थेट खांदा कॉलनीतील पोलीस स्टेशन गाठावे लागते.

## कर्जत नगरपरिषदेतर्फे शहिदांना अभिवादन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

२३ मार्च शहीद दिवस म्हणून ओळखला जातो आज कर्जत नगरपरिषदेतर्फे शहिदांना अभिवादन करण्यात आले.

कर्जत नगरपरिषद कार्यालयात शहीद सुखदेव, शहीद राजगुरू, शहीद भगत सिंग यांच्या प्रतिमेला नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, नगरसेवक राहुल डाळींबकर, सोमनाथ ठोबरे, नगरसेविका विशाखा जिनगरे, प्राची डेरवणकर, आदींसह कर्मचारी सारिका कुंभार, विभावरी म्हामूणकर, शेखर लोहकरे आदी उपस्थित होते.




# अखेर दिशा दर्शक फलकावर हुतात्मा हिराजी पाटील स्मारक मानिवली नाव टाकले

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसची मागणीला यश

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत मुरबाड रोड वरील कळंब पोही येथील एम एस आर डी सी (MSRDC) ने लावलेल्या शासकीय फलकावर हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील स्मारक मानिवलीहे नाव देण्यात यावी अशी मागणी कर्जत तालुका,राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष सागर शेळके यांनी केली होती.

कर्जत कळंब रोड वरील पोही येथील एम एस आर डी सी च्या फलकावरील सगुणा बाग हे नाव एम एस आर डी सी ला केलेल्या पत्र व्यवहारानुसार काढण्यात आले आहे. सदर बोर्डावर हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील स्मारक मनिवली हे नाव देण्यात यावे अशी मागणी दि.७ मार्च २०२२ च्या पत्रात करण्यात आली होती. सदर नाव हे २० दिवसाच्या आत देण्यात यावे असा अल्टिमेटम दिला होता परंतु सदर नाव एम एस आर डी सी कडून अद्याप पर्यंत टाकण्यात आले नव्हते. दि.२७ मार्च ला हा अल्टीमेटम पूर्ण होत आहे, २७ मार्च पर्यंत हे नाव टाकले गेले नाही तर राष्ट्रवादी युवक काँग्रेस कर्जत तालुक्याच्या वतीने पोही येथे तीव्र आंदोलन करून सदर फलकावर दि.२८ मार्च २०२२ या तारखेला हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील स्मारक मानिवली हे नाव राष्ट्रवादी युवक काँग्रेस कर्जत यांच्या वतीने टाकण्यात येईल असा इशारा एम एस आर डी सी ला कर्जत तालुका,राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष सागर शेळके यांनी दिला होता. अखेर आज दि.२३ मार्च रोजी त्या दिशा दर्शक फलकावर हुतात्मा हिराजी पाटील स्मारक मानिवली असे नाव टाकण्यात आले आहे




# मनसेच्या रायगड जिल्हाध्यक्षपदी संदेश ठाकूर

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कट्टर व एकनिष्ठ कार्यकर्ते व रायगड जिल्ह्यात सर्वप्रथम मनसेचा प्रचार व प्रचार करणारे, शाखा स्थापन करणारे उरण तालुक्याचे सुपुत्र संदेश ठाकूर यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या रायगड जिल्हाध्यक्ष (उरण पनवेल )पदी निवड करण्यात आली आहे.

उरण तालुक्यात मनसे पक्ष वाढविण्यात, पक्षाचा विस्तार करण्यात संदेश ठाकूर यांची भूमिका महत्वाची आहे. आजपर्यंतच्या कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविली आहे. जिल्हाध्यक्ष निवडीचे नियुक्ती पत्र राजसाहेब यांनी त्यांना दिले आहे. संदेश ठाकूर यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात येत असून विविध क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. संदेश ठाकूर यांना जिल्हाध्यक्ष पद मिळाल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या निवडी बद्दल संदेश ठाकूर यांनी राजसाहेब ठाकरे व मनसेच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांचे आभार मानले आहे.



# जोहे हायस्कूलचे माजी विद्यार्थी ४६ वर्षांनी एकत्र भेटले

**दै.रायगड नगरी । पेण**

न्यू इंग्लिश स्कूल जोहे मधील माजी विदयार्थी तब्बल ४६ वर्षांनी पुन्हा एकत्र भेटले. १९७३ ते १९७६ या कालावधीत आठवी ते दहावीपर्यंत शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थी, विद्यार्थीनींचे स्नेहसंमेलन नुकतेच पेण - खोपोली बायपास रोडवरील स्पाइस गार्डन मध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाले.



चंद्रकांत गायकवाड आणि चंद्रकांत घरत यांच्या प्रयत्नाने जवळपास ४६ वर्षांनंतर हे विध्यार्थी - विद्यार्थीनी एकत्र आल्याने परस्परांच्या भेटीने आनंदाला अक्षरशः उधाण आले होते. स्नेहसंमेलनाच्या सुरुवातीलाच निधन झालेल्या माजी विद्यार्थ्यांना भावपूर्ण आदरांजली वाहिली. यानंतर प्रत्येकांनी हायस्कूलच्या शिक्षणानंतर आपल्या आयुष्याची वाटचाल कशी झाली याचा आढावा घेताना सद्य:स्थितीत अस-लेला आपला स्टेटस आणि प्रापंचिक माहिती सर्वांना शेअर केली.

यावेळी रामनाथ पाटील यांनी सादर केलेली कविता, एल.डी. कोळी यांनी सादर केलेले जादुचे प्रयोग, भगत यांनी सादर केलेले गाणे याला उपस्थितांकडून भरभरुन दाद देण्यात आली. साठीच्या पुढे वयोमान असलेल्या या माजी विद्यार्थ्यांनी चला विसावू या वळणावर म्हणत एकत्र येऊन आपले सुख - दु:ख वाटून घेण्याचे ठरविले आहे.

त्यासाठी त्यांनी आपला एक ग्रुप तयार केला असून वर्षातून सामाजिक कार्याच्या माध्यमातून एकत्र येण्याचा निश्चय केला आहे. त्यावेळच्या तीन तुकड्या मिळून शंभरी पर्यंतची संख्या ग्रुपमध्ये सामील होण्याची अपेक्षा आहे.

# पोलादपूर येथील सार्वजनिक शिवजयंती मिरवणुकीत अफजलखान वधाचे पथनाट्य प्रभावी

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर येथील सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाच्या मिरवणुकीत श्रीशिवकृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट संचलित शंकरराव गोपाळराव महाडीक इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांकडून अफझलखान वधाच्या पोवाड्यावर आधारित पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले.

पोलादपूर शहरातील सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाच्या मिरवणुकीमध्ये या पथनाट्यांचे शिवप्रेमींनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले. पोलादपूर शहरातील विविध लोकवस्त्यांतील शिवप्रेमींनी विविध दे-खावे सादर करून शिवजयंती उत्सवामध्ये स्फूर्तीदायी वातावरण निर्माण केले.

शंकरराव गोपाळराव महाडिक इंग्लिश मिडीयम स्कूलच्या मुख्याध्यापिका प्रतिभा राकेश उतेकर, सहशिक्षिका स्वाती तासतोडे, प्रणाली पालकर, भाग्यश्री वेल्हाळ, शुभदा जंगम आदींनी या अफझलखान वधाच्या पथनाट्यामध्ये सहभागी झालेले विद्यार्थी कृष्णा उतेकर, मनिष माळी, रिया उतेकर, श्रेयस ढवळे, हर्षद जाधव, दिक्षा साळवी, श्रेया गोळे,श्रावणी महाडीक या विद्यार्थी विद्यार्थिनींकडून तयारी करून घेतली. प्रतापगडाच्या पोवाड्याच्या ध्वनीमुद्रीकेच्या आवाजावर या कलावंत विद्यार्थ्यांनी हा प्रसंग पोलादपूरच्या बाज-रपेठेमध्ये सादर केला.




पोलादपूर येथील तिथीनुसार शिवजयंती उत्सव मंडळाच्या मिरवणुकीत दरवर्षी प्रमाणे उत्साहात शिवप्रेमींनी सहभाग घेतला. यावेळी शिवजयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष अमोल भुवड आणि उपाध्यक्ष अरूण मोहिते व इतर सदस्य आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
### (हक्कसोड पत्राबाबत)

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **हक्कसोडपत्राची जाहीर सूचना.**

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तींची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तींची नावे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता. पनवेल, जि. रायगड | | | | | | | | |
| १ | खारघर २८९ | २५४अ | २४१/४<br>२४१/५<br>२६५/०<br>२६७/२<br>२६९/०<br>२६६/१ | ०-२२-५<br>०-०७-६<br>०-२१-०<br>०-०६-०<br>०-०७-०<br>०-६४-८ | ११५० चौ.मी. पैकी ४२३.५८ चौ.मी. | भूखंड क्र. ई-९९+ई-१००, सेक्टर-३, क्षेत्र ४२३.५८ चौ.मी. | १) श्री. मोहन पांडुरंग बारशे<br>२) श्री. रोहिदास पांडुरंग बारशे<br>३) श्री. रविंद्र पांडुरंग बारशे<br>४) श्री. विजय पांडुरंग बारशे<br>५) श्री. धनंजय पांडुरंग बारशे<br>६) श्री. कृष्णा जेठु बारशे<br>७) श्री. भगवान जेठु बारशे<br>हे एकपक्षी असून हक्कसोडपत्र लिहून देणारे आहेत. | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-३, दस्त क्र.१०५४/२०२२, दि. २८.०१.२०२२ रोजीचे हक्कसोडपत्र प्रमाणे<br>१) श्री. पंढरीनाथ हरिश्चंद्र बारशे<br>२) श्री. किशोर हरिश्चंद्र बारशे<br>यांना हक्क व हितसंबंध प्रदान केलेले आहेत. |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकार**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४८०/२०२१-२२